# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १०/०६/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०६) इतिवृत्त**

**मंगळवार, दिनांक १० जुन २००८ रोजी** स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे दुपारी १२-०० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. या सभेला मा.आयुक्त(म), नगर सचिव यांचे सह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

1. श्री. अ. रशीद खान
2. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
3. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
4. श्री. पाटील नरवडे वसंत पांडुरंग
5. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
6. श्री. कचरू सोनवणे
7. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
8. श्री. रविकांत काशिनाथ गवळी
9. श्रीमती जयश्री किवळेकर
10. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
11. श्री. नारायण तिलोकचंद कुचे
12. श्री. सिताराम सुरे
13. श्री.जावेद हसन खान

**विषय क्र. ३३ :**

दिनांक **२८/०२/२००८** (का.प.क्र.१६), **१५/०३/२००८**(का.प.क्र.१७), **१९/०३/२००८** (का.प.क्र.१८), **२४/०३/२००८**(का.प.क्र.१९), **२५/०३/२००८**(का.प.क्र.२०), व **३१/०३/२००८**(का.प.क्र.२२) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.सिताराम सुरे : दि.३१-३-२००८च्या सभेत क्र.४९५ हा प्रशासकीय ठराव होता. महापालिकेचा भुखंड असून किती हजार चौ. मीटरचा आहे व एखाद्या संस्थेला द्यायचा असल्यास किती देता येतो.

श्री.अ.रशिद खान : यावर नियमाने चर्चा करू शकत नाही चूक काय झाली ती दुरूस्ती करू शकतो.

मा.सभापती : पुढील बैठकीत या ठरावावर संबधीत विभागाने माहिती ठेवावी हा विषय सोडून उर्वरीत सर्व इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दि.**२८/०२/२००८, १५/०३/२००८, १९/०३/२००८, २४/०३/२००८, २५/०३/२००८,** व **३१/०३/२००८** (दि.३१-३-२००८च्या सभेतील ठराव क्र.**४९५** वगळता उर्वरीत इतिवृत्त कायम करण्यास) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**संवाद :**

सौ.मोमीन सफिया : मागिल बैठकील २९ क्रमांका पर्यंत विषय होते आजच्या बैठकीत ३३ पासून सुरूवात आहे. क्र. ३०,३१,३२ क्रमांकाचे कोणते विषय होते. माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : सदर विषय कोणते होते याची प्रत स. सदस्यांना देण्यात येईल.

**विषय क्र. ३४ :** (दि.२८.५.२००८ च्या स्था.स. सभेत स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र.२९ )

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, खिजरी (हत्ती) गेट या ऐतिहासिक दरवाज्याची दुरूस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२१,००,०००/- चे असून या कामाची ई-निविदा विभागातर्फे निविदा मागविण्यात आल्या असता, एकुण २ निविदापत्रक विक्री झाले व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत २ निविदा दरपत्रक प्राप्त झाले. सदर कामाच्या निविदेचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

१. मुबारक मेहबुब पठाण ९.२५% कमी दराने

२. गायत्री आर्कीटेक्ट ७.२५% कमी दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा मुबारक मेहबुब पठाण यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.२५% कमी दराने आहे. सदर दरास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी मुबारक मेहबुब पठाण यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.२५% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशीद खान : स्थगिती देण्यात यावी.

मा.सभापती : हा विषय तुर्त स्थगित करण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३५ :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, पैठणगेट वाहनतळ फी वसुलीचा ठेका बोली/निविदा पध्दतीने दि.१/४/२००८ ते ३१/३/२००९ पर्यंत देण्यासाठी जा.क्र.मनपा/मामअ/२७१/२००८, दि.२७/२/२००८ रोजी स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवुन प्रत्यक्ष बोली/निविदा दि.७/३/२००८ रोजी बोली ठेवण्यात आली असता एकाही ठेकेदाराने कागदपत्रे न आणल्याने बोली रद्द करावी लागली व फेरनिविदा मागविण्यात आली होती.

जा.क्र.मनपा/मामअ/४०१/२००८, दि.१४/३/२००८ रोजी दुसऱ्यांदा स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन प्रत्यक्षात दि.१९/३/२००८ रोजी एकाही ठेकेदाराने अनामत रक्कम व प्रोसेसिंग चार्जेस न भरल्याने बोली होवु शकली नाही.

सदरील वाहनतळासाठी अल्पमुदतीची तिसऱ्यांदा बोली/निविदा सूचना जा.क्र.मनपा/मामअ/४७०/२००८, दि. ८/४/२००८रोजी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देवुन प्रत्यक्षात दि.१५/४/२००८ रोजी बोली/निविदा ठेवली असता फक्त एकाच व्यक्तीने अनामत रक्कम व प्रोसेसिंग चार्जेस भरणा केलेले आहे ते खालील प्रमाणे.

श्री. सय्यद मुर्तुझा अफसर रक्कम रू.४८००/- प्रती माह.

महानगरपालिकेने पैठणगेट वाहनतळ फी वसुलीचा ठेका देण्यासाठी आधारभुत किंमत रक्कम रू.४७८५/- प्रती माह ठेवली असता श्री.सय्यद मुर्तुझा अफसर यांनी प्रती माह रक्कम रू.४८००/- अशी जास्तीची बोली बोलली आहे व तसे लेखी पत्र दिलेले आहे. ज्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी संबंधीतास दिनांक १/६/२००८ ते ३१/३/२००९ या कालावधीसाठी प्रती माह रक्कम रू.४८००/- चा ठेका देण्यासाठी अटी शर्तीस अधीन राहुन वाहनतळ ठेका पध्दतीने देणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.वसंत नरवडे : तिसऱ्यांदा निविदा मागवली एकच आली. माझे माहितीप्रमाणे चारचाकी १०/-रू. तर दोन चाकी वाहनाची ५/-रू. या प्रमाणे सध्या महापालिकेचे कर्मचारी वसूली करीत आहे. ठेकेदारासाठी अनुक्रमे ५/-रू. व ३/- व २/-रू. आहे. तीन तीन वेळेस जाहिरात देवून खर्च करण्याची गरज पडते.यामूळे ठेकेदार पूढे येत नाही. शिवाय २५ हजार डिपॉजिट ०६ महिण्याचे भाडे ॲडव्हॉन्स, पैठणगेटसाठी हा नियम का लागू केला.

मा.सभापती : संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

प्र.मालमत्ता अधि. : या विभागाचा चार्ज आजच माझेकडे आलेला आहे. पुढील बैठकीत माहिती दिली जाईल.

श्री.वसंत नरवडे : तीन महिण्यापासून महापालिका वसूली करीत आहे. सर्वांना सहभागी होता येईल स्पर्धा होईल प्रस्ताव रद्द करून पुन्हा टेंडर मागवावे.

श्री.अ.रशिद खान : जी वसुली होत आहे ते कुठे खर्च होत आहे. ठेका देतांना डिपॉजीट घ्यावे.

मा.सभापती : स.सदस्यांनी केलेल्या सुचनेची दखल घ्यावी. हा विषय रद्द करून पुन्हा निविदा मागविण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सदरील विषय रद्द करून पुन्हा निविदा मागविण्यात याव्या. असे सर्वानुमते ठरले. त्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ३६ :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या मालकीचे पिया मार्केट येथील व्यापारी संकुलातील रिक्त दुकानांचा जाहीर लिलाव जा.क्र.मनपा/मामअ/४१७/२००८, दि.१८/३/२००८ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन दि.२७/३/२००८ रोजी प्रत्यक्षात जाहीर लिलाव ठेवला असता बोलीत खालील व्यक्तींनी भाग घेतलेला आहे ते खालील प्रमाणे आहे.

०१. **दुकान क्र.१** करीता एकुण ३ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

**श्री.अब्दुल हमीद अब्दुल रशीद — रू.१६९०/- शेवटची बोली**

श्री. शेख वसिम मो.इसाकऊद्यीन — रू.१६६०/- शेवटची बोली.

श्री. कचरू धर्माजी सोनवणे - संबंधीताकडे मनपाची थकबाकी असल्याने बोली ग्राह्य धरली नाही.

यामध्ये सर्वात जास्त बोली श्री.अब्दुल हमीद अब्दुल रशीद यांनी प्रती माह रक्कम रू.१६९०/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.५४०/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०२. **दुकान क्र.२** करीता एकुण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

**श्री.अनिल शांताराम दाभाडे — रू.५७०/- शेवटची बोली**

श्री. मो. अमीर अन्सारी — रू.५६५/- शेवटची बोली.

यामध्ये सर्वात जास्त बोली श्री.अनिल शांताराम दाभाडे यांनी प्रती माह रक्कम रू.५७०/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.५४०/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०३. **दुकान क्र.५** करीता एकुण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

**श्री.मो. अमीर अन्सारी — रू.५९०/- शेवटची बोली**

श्री. शफी अब्दुल अजीज — रू.५८५/- शेवटची बोली.

यामध्ये सर्वात जास्त बोली श्री.मो. अमीर अन्सारी यांनी प्रती माह रक्कम रू.५९०/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.५४०/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०४. **दुकान क्र.४** करीता एकुण ३ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

**श्री.पटेल अख्तर हुसेन रू.८०५/- शेवटची बोली**

श्री. मोहंमद अब्दुल कय्युम रू.८००/- शेवटची बोली.

श्री. निलेश कचरूलाल टाक रू.५८५/- शेवटची बोली.

यामध्ये सर्वात जास्त बोली श्री.पटेल अख्तर हुसेन यांनी प्रती माह रक्कम रू.८०५/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.५४०/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०५. **दुकान क्र.६** करीता एकुण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

**श्री.मो. अमीर अन्सारी रू.५८५/- शेवटची बोली**

श्री. शेख कलीमोद्यीन रू.५८०/- शेवटची बोली.

यामध्ये सर्वात जास्त बोली श्री. मो. अमीर अन्सारी यांनी प्रती माह रक्कम रू.५८५/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.५४०/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०६. **दुकान क्र.९** करीता एकुण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

**श्री. मोहंमद युसुफ मोहंमद अजीज रू.५७५/- शेवटची बोली**

श्री. शेख कलीमोद्यीन रू.५७०/- शेवटची बोली.

यामध्ये सर्वात जास्त बोली श्री. मोहंमद युसुफ मो.अजीज यांनी प्रती माह रक्कम रू.५७५/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.५४०/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०७. **दुकान क्र.१३** करीता एकुण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

**श्री. राजेंद्र एकनाथ मोरे रू.५७०/- शेवटची बोली**

श्री. शांतीलाल केशवराव नरवडे रू.५६५/- शेवटची बोली.

यामध्ये सर्वात जास्त बोली श्री. राजेंद्र एकनाथ मोरे, अरूण दगडू माडुकर यांनी प्रती माह रक्कम रू.५७०/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.५४०/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०८. **दुकान क्र.१४** करीता एकुण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

**श्री. राजेंद्र एकनाथ मोरे रू.५७०/- शेवटची बोली**

श्री. शांतीलाल केशवराव नरवडे रू.५६५/- शेवटची बोली.

यामध्ये सर्वात जास्त बोली श्री. राजेंद्र एकनाथ मोरे यांनी प्रती माह रक्कम रू.५७०/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.५४०/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

०९. **दुकान क्र.१५** करीता एकुण २ व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता. ते खालील प्रमाणे.

**श्री. मोहंमद नईम मोहंमद इब्राहिम रू.५८०/- शेवटची बोली**

श्री. मोहंमद युसुफ अब्दुल अजीज रू.५७५/- शेवटची बोली.

यामध्ये सर्वात जास्त बोली श्री. मो.नईम मो. इब्राहिम यांनी प्रती माह रक्कम रू.५८०/- इतकी बोली बोललेली आहे. महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे प्रती माह रू.५४०/- ग्राह्य धरले होते जे की, आधारभुत किंमतीपेक्षा जास्त आहे.

तरी अ.क्र. १ ते ९ नुसार संबंधीतांनी जास्तीची बोली बोलल्यानुसार त्यांची बोली मान्य झाल्यास संबंधीताकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, अनामत रक्कम व ५% सेवाकर घेणे योग्य व नियमाप्रमाणे मालमत्ता कर जो येईल तो अर्जदारास भरणा करावा लागेल.

सदरील दुकान भाडेतत्वावर देण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : एक एक विषय न येता डिपॉजीट घेवून ११ महिण्यासाठी द्यायचे की महापालिकेने चालवायचे एक सिस्टम तयार करावी. परंतू एकत्रित प्रस्ताव यावे. सिध्दार्थ उद्यानसाठी जशी सिस्टम आहे तीच पैठणगेट साठी असावी. आवश्यकता असेल तेथे पे पार्कींग करावे. |
| श्री.रविकांत गवळी | : मंजूर करण्यास हरकत नाही . या प्रमाणे बन्सीलालनगर मध्ये ९ गाळे आहे ते सुध्दा रेडीरेक्नर प्रमाणे जे भाडे असेल त्या पध्दतीने ओपन टेंडर मागवून भाडेने देणेत यावे. |
| मा.सभापती | : त्याची प्रोसेस चालू आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : ज्या ज्या ठिकाणी महापालिकेने गाळे बांधलेले आहे जे भाडेने दिले भाडे देत नाही अशा सर्वच गाळयांचे एकत्रित टेंडर मागवून तसा प्रस्ताव सादर करावा महापालिकेने उत्पन्न वाढेल. |
| मा.सभापती | : स.सदस्यांनी केलेली सुचना विचारात घेवून प्रशासनाने तशी कार्यवाही करावी या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीचे पिया मार्केट येथील व्यापारी संकुलातील रिक्त दुकानांचा जाहीर लिलावातील बोलीनुसार अ.क्र. १ ते ९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे दुकान क्र.१, २, ४, ५, ६, ९, १३, १४, १५ करीता अनुक्रमे **श्री.अब्दुल हमीद अब्दुल रशीद, श्री.अनिल शांताराम दाभाडे, श्री.पटेल अख्तर हुसेन, श्री.मो. अमीर अन्सारी(दुकान क्र.५ व ६करीता), श्री. मोहंमद युसुफ मोहंमद अजीज, श्री. राजेंद्र एकनाथ मोरे(दुकान क्र.१३ व १४करीता) व श्री. मोहंमद नईम मोहंमद इब्राहिम** यांनी जास्तीची बोली बोलल्यानुसार त्यांचे नांवासमोर दर्शविण्यात आलेले भाडे, संबंधीताकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, अनामत रक्कम व ५% सेवाकर तसेच नियमाप्रमाणे मालमत्ता कर आकारून दुकाने भाडेपट्ट्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.32 मो.बुढीलेन जामा मस्जीद कब्रस्थान अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणेच्या एकुण रक्कम रूपये 10,75,000/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा दि.18.9.2007 ठराव क्र.145 अन्वये मंजुरी प्राप्त झाल्यानुसार रितसर निविदा कार्यवाहीअंती खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| 1. | खिरखानी मजूर सह. संस्था | 20.86% कमी दराने |
| 2. | काझी मो.फारूख मो.इस्माईल | 20.00% कमी दराने |
| 3. | एम. ए. सईद | 17.86% कमी दराने |
| 4. | ए.एस. कन्स्ट्रक्शन | 13.60% कमी दराने |
| 5. | असेन्ड कन्स्ट्रक्शन | 9.18% कमी दराने |
| 6. | अरबाज कन्स्ट्रक्शन | 7.00% कमी दराने |

उपरोक्त नुसार तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.86% कमी दराची खिरखानी मजूर सह. संस्था यांची निविदा प्राप्त झाली. तद्नंतर मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.145 दिनांक 16.2.2008 नुसार सदरील कामासाठी रू.2.00 लक्षचा अतिरिक्त निधी वळती करून दिल्यानंतर एकत्रित रक्कम रूपये 10,75,500 + 2,00,000 = 12,75,500/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच सदर काम उपरोक्त प्राप्त निविदा धारकापैकी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.86% कमी दराचे निविदाधारक खिरखानी मजूर सहकारी संस्था यांचेकडून मंजुर निविदा दराने करून घेण्यास मा.आयुक्त महोदय यांची मंजुरी प्राप्त आहे.

करीता उपरोक्त नुसार सुधारीत अंदाजपत्रक तसेच जामा मस्जीद कब्रस्तान अंतर्गत काम करण्याच्या परवानगीसह सदरील काम खिरखानी मजूर सहकारी संस्था यांचेकडून प्राप्त निविदा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.86% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.32 मो.बुढीलेन जामा मस्जीद कब्रस्थान अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी रक्कम रू.12,75,500/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. तसेच जामा मस्जीद कब्रस्तान अंतर्गत काम करण्याच्या परवानगीसह, सदरील काम खिरखानी मजूर सहकारी संस्था यांचेकडून प्राप्त निविदा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 20.86% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. ३८ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक वित्त विभाग/मभवा/११०८/प्र.क्र.२१/सेवा/९, मंत्रालय, मुंबई दि.१६ मे २००८ नुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दि. १ जानेवारी २००८ पासुन ६% वाढ मंजुर केलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दि.१.१.२००८ पासुन महागाई भत्ता ४१% ऐवजी ४७% अदा करण्यासाठी मासिक रू.१४.५९ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सन २००८-२००९ च्या अर्थसंकल्पात वेतन व भत्ते अदा करण्यासाठी स्वतंत्र तरतुद करण्यात आलेली आहे. या तरतुदीतुन सदरील खर्च भागविण्यात येईल. महागाई भत्ता ४१% ऐवजी ४७% या दराने महानगरपालिका कर्मचाऱ्यांना माहे जुन २००८ पासुन लागु करण्यास व मे २००८ पर्यंत थकबाकी अदा करण्यास तसेच माहे जुन २००८ च्या मासिक वेतनापासुन नियमीत पगारात महागाई भत्ता समाविष्ट करण्याकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.सतीश कटकटे : मागिल बैठकीत ऐनवेळी घेणार होतो. या वेळेस विषयपत्रिकेवर का आलेले नाही. यावर अभ्यास करावा लागेल त्यानंतर निर्णय घ्यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :शासनाने मान्य केले त्यानुसार देणे जरूरी आहे. वसुली झाली तर खर्च करता येतो. हा खर्च कोठून करणार आहे. वसुली जास्तीत जास्त झाली पाहिजे हा संदर्भ यात लावता येईल का हे बघावे. वसूली नाही विकास कामे थाबवून कर्मचाऱ्यांना याप्रमाणे महागाई भत्ता देणे योग्य होते का? वसुली झाली पाहिजे अशी अट घालावी.

श्री.रविकांत गवळी :यात मान्यता देण्यात हरकत नाही शासनाने दिले. राज्य शासन निष्क्रीय आहे कारण अनेक लहान मोठया वस्तूची महागाई वाढलेली आहे. या शासनाचा आम्ही निषेध करतो.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जेवढी महागाई झाली तेवढा भत्ता वाढवून द्यावाच लागतो हे शासनाने नियम घातलेले आहे. केंद्र शासनाचे नियम आहेत, द्यावे लागेल. महागाईस युती सरकार जबाबदार आहे.

श्री.रविकांत गवळी : एवढी महागाई वाढली की १४ टक्के द्यायला पाहिजे होते.

श्रीमती जयश्री किवळेकर: युतीच्या सरकारने जनतेला स्वस्तामध्ये जे देता येईल ते दिले. गेल्या पाच वर्षात या शासनाने जनतेला महागाईचे खाईत टाकले आहे.

मा.सभापती : पेट्रोलचे भाव वाढले यास राज्य शासन जबाबदार नाही.

श्री.रविकांत गवळी : सरकारने खुपच महागाई वाढवली. वस्तुस्थिती मान्य करावी लागेल. समितीने निषेध केला पाहिजे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : भाववाढ का होते हा सभागृहाचा विषय नाही. या महापालिकेत अनेक वर्षापासून युतीची सत्ता आहे जनतेला काही दिले नाही.

(याच वेळी स.सभासद आपसांत मोठमोठयाने बोलतात.)

श्री.वसंत नरवडे : शासनाने कर्मचा-याकडे लक्ष देवून महागाई भत्ता वाढवून देण्याचे काम केले. महागाई वाढली याची जाणीव सरकारला आहे निषेध करणे योग्य नाही. हे शब्द इतिवृत्तातून वगळावे.

श्री.रविकांत गवळी : शासनाने मंजूर केले मान्य आहे परंतू ही महापालिका स्थानिक स्वराज्य संस्था आहे. द्यायचे की नाही हा आपला अधिकार आहे.

मा.सभापती : २०००साली युतीची सत्ता होती त्यावेळी पेट्रोलचे भाव प्रति बॅरल ६२/-रू. होते आता १३८/-रू. आहे. यास महाराष्ट्र शासन जबाबदार नाही.

श्री.रविकांत गवळी : शासनाने मान्य केले जीआर काढून अमलबजवणी करणे हे शासनाचेच काम नसून ही स्वायत्त संस्था असते. खर्चाची आवक जावक महापालिकेला करावी लागते.आज कर्मचा-यांचे पगार ठेकेदाराची बिले वेळेवर दिली जात नाही ६-७ टक्के वाढविणार या पोटी शासनाकडून अनुदान घ्यावे कर्मचा-यांची एवढी काळजी शासनाला वाटत असेल तर इतरही सवलती द्याव्यात. शासन इतर महापालिकेत मोठया प्रमाणात अनुदान देते येथे युतीची सत्ता असल्याने अनुदान येत नाही असे वाटते.

मा.सभापती : महापालिकेचे कर्मचारी शासनाचे काम करीत नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : १५ वर्षात मिळाले नव्हते एवढे या तीन वर्षात शासनाने अनुदान दिले.भाववाढीचा विषय या सभागृहाचा नाही.

श्री.नारायण कुचे : समांतर जलवाहिनीसाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करतो का देत नाही.
(याच वेळी सभागृहात स.सभासद आपसांत मोठमोठयाने बोलतात.)

श्री.अ.रशिद खान : पर्यटन स्थळासाठी २५ कोटी आले शासनाचे अभिनंदन करावयास पाहिजे.

श्री.गवळी रविकांत : शासनाने अनुदान दिले असले तरी अटी शर्ती तशा टाकलेल्या आहे अमलबजावणी करणे शक्य होत नाही.कर्मचा-याचे पगार, ठेकेदाराचे बिल वेळेवर दिले जात नाही. ठेकेदार काम करण्यास तयार नाही जे काम झालेले नाही त्याचे बिल दिले जाते. या संदर्भात चर्चा झाली होती. माहिती देणार होते. स्थायी समितीला माहिती दिली नाही.

मा.सभापती :मनपाच्या आर्थीक स्थिती बाबत संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

प्र.मुख्यलेखाधिकारी : मा.आयुक्त यांनी २७९ कोटीचा चालू वर्षाचा अर्थसंकल्प स्थायी समितीकडे सादर केला १५ कोटी स्थायी समितीने वाढ केली. सर्वसाधारण सभेने अंतिम मंजूरी दिली साधारण ३८५ कोटीचे बजेट होईल. सन २००७-०८ चे सुधारीत बजेटनुसार ३७ टक्के उत्पन्न कमी आलेले आहे. जी कामे मंजूर होतात ती अर्थसंकल्पातील तरतूदीला अनुसरून ठेवतो जे महत्वाचे विकास कामे आहे त्यास वेळोवेळी मान्यताच दिली असून बजेट तरतूद नुसार जेवढे उत्पन्न यायला पाहिजे ते येत नाही त्यामूळे ही आर्थीक सांगड घालता येत नसल्याने ही परीस्थिती उद्‌भवली आहे असे प्रशासनाचे मत आहे.

श्रीमती जयश्री किवळेकर : बजेट फुगवून दाखविले जाते. परंतू तेवढी वसुली होत नाही ती न होण्यास जबाबदार कोण आहे? सभागृहात तीन उपआयुक्त उपस्थित असून त्यांना कोणते अधिकार दिलेले आहे दिलेल्या आदेशाची अमलबजावणी करणार का?

श्री.रविकांत गवळी : सर्वसाधारण सभेने अंतीम केलेले बजेट बूक केंव्हा देणार आहे. ते किती कालावधीत तयार केले पाहिजे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : स्थायी समितीने मान्यता दिली आहे. सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेले बजेट येईल तोपर्यत स्थायी समितीने मान्यता दिल्यानुसार लागु राहते. कामे करण्यास हरकत नसावी.

श्री.अ.रशिद खान : बजेट मंजूर करतांना वाढ करून मंजूरी दिली जाते ही पध्दत बंद करावी. वाढ करून दिले तर वसुली सुध्दा झाली पाहिजे. ठराविक वार्डातच कामे होतात. १०० कोटी स्पील ओव्हरमध्ये जाते नवीन कामे होत नाही.गेल्या वर्षी २२५ कोटी बजेट ३०० कोटीचे केले. उत्पन्न येणार कोठून? कामे झाली नाही ठेकेदार बिलासाठी चकरा मारत आहे हे कोठेतरी थांबविले पाहिजे.

श्री.रविकांत गवळी : वार्डातील विकास कामासाठी सदस्य बजेट वाढवितात. प्रशासन जे बजेट सादर करते त्यामागचे ध्येय पूर्ण होते का? नगरसेवकांनी मुलभूत सेवांसाठी बजेट मध्ये तरतूद ठेवू नये का?

श्री.अ.रशिद खान : पाच वार्डसाठी १० लक्ष तर दुस-या पाच वार्डासाठी १ ते १.५० कोटी खर्च होते. जास्तीचा खर्च कोठून करणार वार्डाच्या विकासासाठी किती खर्च करणार लिमीट ठेवावे.उत्पन्न कोठून येणार याचा विचार केला पाहिजे.टारगेट ५० कोटीचे वसुली होते १७ कोटी त्यामूळे ही परीस्थिती निर्माण होते.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : बजेट मध्ये बदलावा होणेसाठी तसा ठराव करण्याचे ठरले होते. येणाऱ्या उत्पान्नातून वार्डात ज्या बेसीक सुविधा पाहिजे त्या होत नाही. त्यावर किती खर्च करायचा लिमीट असावे. जेथे काम करणे आवश्यक आहे तेथेच करावे. तीन वर्षाच्या कार्यकाळात जेथे गरज नसतांना कामे झाली. २८० कोटीचे बजेट होते आता ३८५ कोटीचे केले. ५० टक्केसुध्दा वसूली होणार नाही. ५० लक्षचे बजेट वार्डासाठी असेल तर १५-२० लक्षच्या वर काम होणार नाही अशी परीस्थिती आहे.सर्व वार्डासाठी सारखे बजेट ठेवून त्या प्रमाणेच स्थायी समितीने मान्य केले पाहिजे.

श्री.कचरू मोरे : हे मंजूर करण्यास दुमत नाही. मनपाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून शासनाने परीपत्रक देतांना अनुदानही पाठवायला पाहिजे होते. बजेट वर चर्चा व नियोजन करतांना येणा-या उत्पान्नावर चर्चा करणे आवश्यक असते. तामिळनाडू, आंध्र प्रदेश स्टेटच्या महापालिकेत जकात नाही. मालमत्ता कर व पाणीपटटी कर व शासनाच्या अनुदानावर कारभार चालतो. स्वत:हून कर भरण्यासाठी मानसिकता तयार केली पाहिजे.असे असून सुध्दा महापालिकेची आर्थीक परीस्थिती व तेथील रस्ते चांगले आहे.जकात असतांना सुध्दा जी परीस्थिती आज आहे ज्यांनी ती जबाबदारी करून ठेवली त्या बाबीचा मी निषेध करतो. आज ही जकात वसूली होत आहे तीन वर्षात ठेकेदाराचे बिल कधी ही थांबले नाही परंतू बिल न मिळत असल्याने वार्डातील कामे थांबून आहे.वार्डात विकास कामे झाली नाही तर नागरीक नाराज असतात.कोणत्या कर्मचा-यांनी किती काम करायचे याचा मापदंड लावता का? जे ९.०० कोटीचे पेमेन्ट थांबले त्यास जबाबदार कोण? बजेट फुगवत असेल तर मा.महापौर, मा.सभापती यांचे प्रशासनाने निदर्शनास आणून द्यायला पाहिजे. टॅक्स भरणा करण्याची मानसिकता जनतेत निर्माण करण्यासाठी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे. सन २००० एमएसईबीचे शहरी उत्पन्न वर्षाचे ४५० कोटीचे होते. कर्मचाऱ्यांना कामाचा मापदंड लावला जातो म्हणून २००५ साली ते उत्पन्न ११५० कोटीवर गेले. याप्रमाणे महापालिकेने केले पाहिजे तरच या महापालिकेची विकास कामे व्यवस्थित होतील. कर्मचाऱ्यांचे पगार थांबवू नये, वेळेवर व्हावे. याची लेखाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

मा.सभापती : किती रक्कमेचे पेमेन्ट थांबलेले आहे याचा खुलासा करावा.

प्र.मुख्यलेखाधिकारी : जमा व खर्च यावर नियंत्रण ठेवणे या विभागाचे काम आहे. जेवढे उत्पन्न होते तेवढयाच रक्कमेला लेखा विभागातून मान्यता होते. सन २००७-०८ चा सुधारीत अर्थसंकल्प हा २५७ कोटीचा होता. वसूली २२१ कोटीच झाली विकास कामाचे बिले संबधीत विभागाने लेखा विभागाकडे पाठविले बजेट व प्रत्यक्ष वसूली यात ३४ कोटीची तूट आलेली असून प्रलबींत देयके ६-५० कोटीची असून इतर कामाचे देयके देण्यात आल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहत आहे त्यातून हे पेमेन्ट देण्यात येत आहे.

श्री.रविकांत गवळी : तारीख वाईज धनादेश तयार केल्यानंतर त्यापध्दतीने पेमेन्ट होत आहे का?

श्री.अ.रशिद खान : कर्मचा-यांचे पगार उशीरा का होत आहे.

प्र.मुख्यलेखाधिकारी : सर्व कर्मचाऱ्यांचे पगार हे बॅंकेमार्फत होते. वर्ग-४ चे कर्मचारी यांचे पंजाब नॅशनल, विजया इ. बॅंकांमधून पेमेन्ट होत असे. बॅंक अधिकाऱ्यांसोबत कर्मचाऱ्यांनी गैरवर्तन

केल्यामुळे कर्मचाऱ्यांचे पगार करण्यास बँक तयार नव्हती. म्हणून रोखीने केले दोन दिवस उशीर झाला.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : रोखीने पगार व्हावा यासाठी हे कृत्य केले का याचा शोध घ्यावा. रोखीने पगार होत होते तेंव्हा नाव एकाचे पगार दुसराच घेवून जात असे त्यामूळे बँकेमार्फत केले. राज्यात पूर्ण शिक्षण विभागाचे पेमेन्ट बँकेतून होते. ज्यानी गैरवर्तन केले त्यांचे न करता उर्वरील लोकांचे बँकेतूनच पेमेन्ट व्हावे व यापूढे रोखीने पेमेन्ट होवू नये असे आदेश करावे.

मा.सभापती : महापालिका कर्मचा-याचे पेमेन्ट रोखीने न देता बँकेमार्फतच करावे. स.सदस्य श्री.रविकांत गवळी यांचा खुलासा करावा.

प्र.मुख्यलेखाधिकारी : १, २, ३ लक्ष पर्यतचे धनादेश असेल त्यांना प्रथम प्राधान्य त्यानंतर ५ ते ७ लक्ष पर्यंतचे धनादेश व नंतर यापेक्षा जास्त रक्कमेचे धनादेशा दिले जात होते.

श्री.रविकांत गवळी : सभागृहात तीन उपआयुक्त आहे त्यांना काय अधिकार आहे व त्यांचेकडे सध्या काय काम आहे.

उपआयुक्त(म) : उपआयुक्त(महसूल) यांचे अतर्गत अस्थापना, जकात, मालमत्ता, अग्निशमन, प्रशासकीय असे विभाग येतात.

श्रीमती जयश्री किवळेकर: उपआयुक्त श्री. शेटे हे यांचेकडे कोणते काम आहे.

उपआयुक्त (सिडको) : १२ जूलै २००७ रोजी मी उपआयुक्त(सिडको) म्हणून रूजू झालो व उपआयुक्त(सिडको) म्हणून कोणतेही काम दिले नाही. त्या व्यतिरिक्त माझेकडे कर निर्धारक व संकलक म्हणून अतिरिक्त पदभार व निवडणूकीचे कामही माझेकडे होते. १८ मार्च २००८ रोजी या पदावर श्री.अरब साहेब रूजू झाले. ३१ मार्चपर्यंत या पदावर मी काम केले आता श्री. अरब साहेब हे काम पाहत आहेत. त्यानंतर मला कामाचे कोणतेही नव्याने आदेश प्राप्त नाही. सिडको विभागाकडील कर आकारणी झालेले संगणीकृत बिले देण्याचे काम पूर्ण केले आहे. १.५० कोटी वसूली सिडकोची झालेली आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : कामाचे वाटप कोण करतात. आयुक्तांचे अधिकार असेल तर स्थायी समितीचे अधिकार काय आहे.

उपआयुक्त(प्र.) : आतापर्यत अधिनियमाच्या कलम ६९ प्रमाणे मा.आयुक्त यांनी त्यांचे अधिकार वेगवेगळया अधिकाऱ्यांना प्रदान केले आहे. माझेकडे प्रकल्प, शिक्षण, पशुधन विकास, सांस्कृतिक, जनसंपर्क असे विभाग आहे. हे सर्वाचे अधिकार मा. आयुक्तांच्या आदेशान्वये झालेले आहे.आयुक्तानी किंवा त्यांचे अधिपत्त्याखाली जे कर्मचारी आहे त्यांचेकडून स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेने जे जे निर्णय घेतले जातात त्याची अमलबजावणी करणे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : माझे मते मा.आयुक्तांना स्वतंत्र असे कोणतेही अधिकार नाही. सभागृहाने जे जे निर्णय धेतले त्यांची अमलबजावणी करणे मा.आयुक्त व जे उपआयुक्त असतील त्यांना बंधनकारक आहे. सिडकोसाठी जे उपआयुक्त दिले त्यांचे मार्फत सिडकोतील सर्व कामे व्हावी असा ठराव घ्यावा प्रशासन अमलबजावणी करावी. सर्व उपआयुक्ताकडे वेगवेगळे विभागाचे काम देऊन समान काम द्यावे. एक उपआयुक्ताकडे २५ विभाग तर दुसरे अधिकारी यांचेकडे एकही नाही ही पध्दत बंद करावी. स्थायी समितीने घेतलेल्या ठरावाची अमलबजावणी १५ दिवसात करावी.

उपआयुक्त(प्र.) : अधिनियमामध्ये असेही अधिकार आहे मा. आयुक्त हे स्वतः प्रदान करू शकत नाही स्थायी समितीच्या मंजूरीने करावे लागते.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : मा.आयुक्त किंवा उपआयुक्त यांना वैयक्तिक कुणासही अधिकार नाही. कॅबीनेट चा जो निर्णय होईल ते राबवून घेण्याचा अधिकार मुख्य सचिवांना असतो. त्याप्रमाणे

महापालिकेत जे जे निर्णय आमसभेत होतील ते राबविण्याचे काम प्रशासनाच्या अधिकाऱ्याचे आहे.

श्री.अ.रशीद खान : सभेने घेतलेल्या ठरावाची अमलबजावणी करणे प्रशासनास बंधनकारक असतेच असे नियम आहे का?

उपआयुक्त(प्र.) : अधिनियमाचे कलम ६९ प्रमाणे काही अधिकार मा.आयुक्त प्रदान करू शकतात. काही अधिकार स्थायी समितीच्या मंजूरीने करता येतात. स्थायी समितीचे अधिकार काम करून घेण्याचे आहे. कर्मचाऱ्यांचे बाबतीत मा.आयुक्तांची ॲथॉरिटी आहे.

श्री.अ.रशिद खान : कुणास निलंबीत व इतर कार्यवाही झाली त्याविषयी स्थायी समितीला अपील मंजूर करण्याचे अधिकार आहे.

उपआयुक्त (प्र.) : त्यात डिसमीसल, रिम्युव्हल, तसेच सेवेतून कायमस्वरूपी काढणे असे तीन मुद्दे येतात.या बाबतीत मा.आयुक्त स्वत कार्यवाही करू शकत नाही स्थायी समितीची मंजूरी घ्यावी लागते.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : आम सभेत जे निर्णय होतात त्यांचे अधिन राहून मा.आयुक्तांना कार्यवाही करावी लागते. इतर स्वतंत्र असे अधिकार प्रशासनाला नाही.

श्री.अ.रशिद खान : स.सदस्य श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर जे बोलत आहेत ते बरोबर आहे. नगर सचिव यांचेकडून खुलासा घ्यावा.

नगरसचिव : सभेत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे कार्यकारी अधिकार सर्व मा.आयुक्ताकडे निहित आहे. तसेच अधिकारी कर्मचारी बध्दल अपील ५६ खाली स्विकारण्याचे अधिकार स्थायी समितीस आहेत. सर्वसाधारण सभा व स्थायी समितीला अधिन राहून तात्पुरते नेमणुकीचे अधिकार मा.आयुक्तांना आहेत. अशा मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या वेगवेगळया कलमाखाली व कलम ६९ खाली जे अधिकार प्रदान करायचे ते स्थायी समितीची मंजूरी घेवून कार्यकारी अधिकार उपआयुक्त, सहाय्यक आयुक्त किंवा इतर अधिकाऱ्यांना प्रदान करता येतात. त्यात प्रशासकीय, आर्थिक अधिकार येतात व अधिनियमाच्या विविध कलमान्वये अधिकार व कामाचे स्वरूप ठरविलेले आहे.

श्रीमती जयश्री किवळेकर: शासनाची पॉलीसी अशी आहे की कामाचे वाटप झाले पाहिजे नागरीकाची कामे वेळेवर व्हावी म्हणून सहा वार्ड कमेटी निर्माण केल्या. सन २००६ मध्ये सिडको हस्तांतरणानंतर वार्ड कार्यालय **इ** आणि **ब** मध्ये सर्व सिडकोचा भाग येतो सध्या श्री. शेटे साहेब यांचेकडे कोणतेही काम नाही. म्हणून सिडकोचे पुर्णवेळ सर्व कामे त्यांचेकडे देवून त्यांना कर्मचारी व आर्थिक सर्व अधिकार द्यावेत.

मा.सभापती : या संदर्भात नवीन आयुक्त आलेले असून त्यांचेशी चर्चा झालेली आहे.श्री.शेटे साहेब यांचेकडे काम द्यायचे प्रशासनाने ठरविलेले आहे. मा.आयुक्तांकडे ती संचिका आहे.

श्री.रविकांत गवळी : आजच्या सभेला मा.आयुक्त नाहीत काही निर्णय घेतल्यानंतर उपआयुक्त अमलबजावणी करणार काय? दोन उपआयुक्त यांचेकडे पाच ते सहा विभागाचा प्रत्येकाकडे चार्ज आहे. श्री. शेटे साहेब यांचेकडे कोणताही चार्ज नाही. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे व नागरीकीकरणामूळे झालेल्या समस्या हाताळण्यासाठी यशदा संस्थेमार्फत प्रशिक्षणासाठी शासनाकडील अधिकारी पाठथ्वले जाते यासाठी महापालिका २ लक्ष खर्च करीत आहे. अधिकारी प्रशिक्षणासाठी गेलेत का दोन महिण्यापासून श्री. शेटे यांचेकडे कोणतेही काम नाही. ते प्रशिक्षणासाठी जाणार आहे का यावर २ लक्ष खर्च का करायचा. ते कधी जाणार आहेत?

मा.सभापती : उपआयुक्त श्री. शेटे यांचेकडे चार्ज देण्या संदर्भात मा. आयुक्त यांचेशी चर्चा केलेली आहे. त्यांचेकडे सदर संचिका कार्यवाहीसाठी आहे.

उपआयुक्त (म) :या प्रशिक्षणासाठी प्रत्यक्ष खर्च झालेला नाही.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : मी माहिती घेतली. संचिका सादर झाली आहे. तत्कालीन आयुक्तांचे सह्या झालेल्या नाहीत. |
| उप आयुक्त(म.) | : स्थायी समितीने शिफारस केली. प्रशिक्षणास पाठविले नाही. ज्ञान अद्यावत करण्यासाठी प्रशिक्षणास पाठवता येते. प्रशासकीय विभागाचे कामा संदर्भात चर्चा केली. इमारत निरीक्षक नसल्यामुळे पुढील निर्णय घेऊ शकत नाही. |
| श्री.रविकांत गवळी | : यासाठी दोन लक्ष खर्च होणार ते नियमाने करणे गरजेचे आहे का? |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : तरतूद करून ठेवलेली आहे पाठवू शकतो किंवा पाठवू शकतही नाही असे ही आहे. |
| श्री.अ.रशीद खान | : प्रशिक्षणसाठी अधिका-यांना पाठवू शकतो. |
| श्री.रविकांत गवळी | : याचा नंतर खुलासा करावा प्रशासकीय विभाग उपआयुक्त (म) यांचेकडे असून अतिक्रमणा विषयी चर्चा केल्यास इमारत निरीक्षक कमी आहे कोणतीही ॲक्शन घेतली जात नाही.विभाग प्रमुखाकडून पत्र गेल्यानंतर कार्यवाही करणे आवश्यक असते. ३१-५-२००८ रोजी कार्य.अभियंता ड्रेनेज यांनी पत्र देवून नाल्याच्या भिंतीच्या वर संरक्षित भिंतीच्यावर अतिक्रमण होत आहे डायरेक्ट संबधीत अधिकारी यांचे निदर्शनास आणून दिले अद्याप कार्यवाही का केली नाही. |
| उपआयुक्त (म) | : सदर पत्र प्रशासकीय विभागाकडे देण्यात आलेले आहे. इमारत निरीक्षक यांची संख्या कमी असून हा विभाग सक्षम करण्यासाठी मा.आयुक्त यांचेशी चर्चा झाली, आणखी कर्मचारी देणार आहोत. |
| श्री.रविकांत गवळी | : पत्र दिले १० दिवस झाले त्यावेळी नुसते फुटींगपर्यत काम आले होते. ते काढणे शक्य झाले असते. ती जागा कुणाच्या मालकीची आहे याची कल्पना प्रशासनाला नाही. सात फुट लेन्टल पर्यत काम केल्यावर नोटीस दिल्याशिवाय पाडता येत नाही. यापूर्वीच कार्यवाही का केली नाही स्लॅबचे काम झाले आता काय कार्यवाही करणार आहे. |
| प्र.प्रशासकीय अधि. | : या ठिकाणी कुणीतरी बांधकाम करीत आहे अशी फोनवरून माहिती मिळाली. त्यानुसार इमारत निरीक्षक यांना लगेच पाठविले, होत असलेले काम थांबविण्याबाबत आदेशीतही करण्यात आले होते. त्या प्रमाणे ३१ तारखेला सायंकाळपर्यत त्या ठिकाणचे जेवढे काही बांधकाम चालू होते तेथील सामान उचलून आणले व बांधकामही थांबविले होते.३१ तारखेपासून मी रजेवर असल्यामूळे व कालच रूजू झाल्याने आज या संबधी माहिती घेवून कार्यवाही करण्यात येईल. |
| मा.सभापती | : कधी पाडण्यात येईल. |
| प्रशासकीय अधिकारी | : लिंटल लेव्हलपर्यत झाले असेल तर नोटीस देवून कार्यवाही करावी लागेल. |
| श्री.सतीश कटकटे | : दैनिक सामनामध्ये बातमी आली, फोटो प्रसिध्द झाले. दै.सामनातून फोन आला त्यावेळी का कार्यवाही केली नाही. आजही तेथे बांधकाम चालू आहे. |
| प्रशासकीय अधिकारी | : बाधंकाम बंद केलेले होते. चालू असेल तर त्वरीत बंद केले जाईल. व्हिडीओ शुटींग घेतो. ते बांधकाम बंद करण्यात येईल. |
| श्री.जावेद हसनखॉन | : माझे माहिती प्रमाणे महापालिकेच्या जागेवर बांधकाम चालू नाही. |
| श्री.सतीश कटकटे | : सध्या काम चालू आहे. नसेल तर तसा खुलासा घ्यावा. |
| प्रशासकीय अधिकारी | : कार्य.अभियंता यांचे पत्रानुसार सदर काम संरक्षित भिंतीवरच चालू असल्याचे म्हटले आहे. |
| श्री.सतीश कटकटे | : प्रशासकीय अधिकारी यांनी स्वत: पाहणी करून कार्यवाही करावी. |
| मा.सभापती | : प्रशासकीय अधिकारी यांनी आजच्या आज पाहणी करून आजच्या आज कार्यवाही करावी. प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक वित्त विभाग/मभवा/११०८/प्र.क्र.२१/सेवा/९, मंत्रालय, मुंबई दि.१६ मे २००८ नुसार राज्य शासकीय व इतर पात्र

कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दि. १ जानेवारी २००८ पासुन ६% वाढ मंजुर केल्यानुसार महानगरपालिका कर्मचाऱ्यांना, महागाई भत्ता ४१% ऐवजी ४७% या दराने माहे जुन २००८ पासुन लागु करण्यास व मे २००८ पर्यंत थकबाकी अदा करण्यास तसेच माहे जुन २००८ च्या मासिक वेतनापासुन नियमीत पगारात महागाई भत्ता समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री. राजेश होलुराम डुगलज, मजुर, पुराण वस्तु संग्रहालय यांची नियुक्ती कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-२/२००४/१२५०, दि.२७.१.२००४ अन्वये झालेली आहे.

सदर कर्मचारी ११२४ भरतीमधील असुन अद्याप त्याचा परिविक्षाधिन कालावधी खुला झालेला नाही. जानेवारी २००४ मध्ये रूजू झाल्यानंतर माहे नोव्हेंबर २००४ पासून त्याने विनापरवानगी गैरहजर राहण्यास सुरूवात केली. प्रत्येक महिन्यात सर्वसाधारणपणे ६ ते ७ दिवस तो गैरहजर रहात असे. माहे नोव्हेंबर २००४ ते ऑक्टोबर २००६ मध्ये तो एकुण ३३८ दिवस गैरहजर राहिला.

दिनांक २७.१०.२००६ ला अर्ज करून त्याने आजारी असल्यामुळे कामावर हजर राहिलो नाही, आता रूजू करून घ्यावे असा अर्ज सादर केला होता. परंतु गैरहजर कालावधीत त्यांने कार्यालयास काही एक सुचना दिली नव्हती.

संबंधीताच्या विनंती अर्जानुसार जा.क्र.मनपा/अस्था-२/२००७/४७५, दि.२०.४.२००७ चे आदेशान्वये यानंतर विनापरवानगी गैरहजर राहिल्यास मनपा सेवेतून कायमचे कमी करण्यात येईल या अटीवर दोन वेतनवाढी कायमस्वरूपी थांबवून कामावर रूजू करून घेण्यात आले होते.

परंतु कामावर रूजु झाल्यानंतर संबंधीताचे वर्तणुकीत काही एक परिणाम झाला नाही. पुन्हा तो जून २००७ ते डिसेंबर २००७ पर्यंत (६६) दिवस विनापरवानगी गैरहजर राहिला व जानेवारी २००८ पासून अद्यापपर्यंत गैरहजर आहे. संबंधीत विभागाने वेळोवेळी सुचनेनुसार त्यास कामावर घेतले होते. परंतु दि.२३.१.२००८ चे पत्रान्वये कार्यकारी अभियंता(ज.नि.,वि.,इ.व उ.) यांनी पत्र देऊन सदर कर्मचारी विनापरवानगी गैरहजर असून त्याचे विरूध्द कार्यवाही करणेस्तव शिफारस केली होती.

सदर पत्राचे अनुषंगाने संबंधितास जा.क्र.मनपा/आस्था-२/२००८/८१० दि.१५.२.२००८ अनवये कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा (०७) दिवसांचे आंत सादर करणेबाबत सूचना देण्यात आली होती. परंतु संबंधीताने अद्याप पर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

उपरोक्त बाबींचे अवलोकन केल्यास तसेच संचालक, पुराणवस्तु संग्रहालय यांनी वेळोवेळी सादर केलेला अहवाल पाहता श्री.राजेश होलुराम डुगलज यांना वेळोवेळी तोंडी व लेखी सुचना देऊनही त्यांचे वर्तणुकीत काहीएक परिणाम न झाल्याने प्रशासनाची अडचण झालेली आहे.

सदर बाबींमुळे संबंधीतास नोकरीची आवश्यकता नाही ही बाब सिध्द होते. त्यामुळे श्री.राजेश होलुराम डुगलज यांना आपल्या वर्तणुकीत सुधारणा करण्याची वाजवी संधी देऊनही त्यांचे वर्तणुकीत काही एक परिणाम झालेला नसल्यामुळे संबंधितास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम ५६(२) (ग) नुसार पुढे नौकरी मिळण्यास अपात्र होणार नाही अश्या प्रकारे मनपा सेवेतून काढून टाकण्याचा निर्णय प्रशासनातर्फे घेण्यात आला. ५६(१) अ नुसार भत्ते वगळुन ज्याचे मासिक वेतन (एक हजार रूपयाहून) अधिक आहे अशा कोणत्याही मनपा अधिकाऱ्यास व कर्मचाऱ्यास स्थायी समितीच्या पुर्व संमतीवाचून आयुक्ताकडून बडतर्फ केले जाणार नाही, सदर कर्मचाऱ्यास वारंवार लेखी व तोंडी सूचना देऊनही त्याच्या वर्तणुकीत काही एक परिणाम झालेला नाही ही बाब ५६(१) नुसार त्याने आपल्या कर्तव्यात कसूर केल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे संबंधीतास मनपा सेवेतुन कायमचे काढुन टाकण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.राजेश होलुराम डुगलज, मजुर, पुराण वस्तु संग्रहालय हे विनापरवानगी सतत गैरहजर रहात असून त्यांना वेळोवेळी तोंडी व लेखी सुचना देऊनही त्यांचे वर्तणुकीत काहीही बदल झालेला नाही. तसेच प्रस्तावात नमुद केल्यानुसार संबंधीतास नोकरीची आवश्यकता नाही ही बाब सिध्द होत असून, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम ५६(१) नुसार त्याने आपल्या कर्तव्यात कसूर

केल्याचे सिध्द झाले असल्याने संबंधीतास मनपा सेवेतुन कायमचे काढुन टाकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४० :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या जुना फारोळा पंपगृह येथील ४७५ अ.श. क्षमतेचे सहा सेंट्रीफ्युगल, पंपासाठी मॅथर ॲण्ड प्लॅट कंपनी बनावटीचे सुटे पार्टस् खरेदीसाठी रक्कम रू.११,७४,१५९/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.३६३ दि.५.२.२००८ प्रमाणे स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरील कामासाठी प्रस्तावीत बनावट, कंपनीचे उत्पादक/अधिकृत विक्रेता मार्फत निविदा मागविण्यात आलेली असता दोन निविदा विक्री झाल्या व निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या असून त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

१. मे. अमीत इंजिनिअर्स, औरंगाबाद ०.५७% कमी दराने

२. मे. ओम मार्केटींग औरंगाबाद ६.५१% जास्त दराने

वरील प्राप्त निविदापैकी मे.अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५७% कमी दराने आहेत. त्यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मे.अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५७% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या जुना फारोळा पंपगृह येथील ४७५ अ.श. क्षमतेचे सहा सेंट्रीफ्युगल, पंपासाठी मॅथर ॲण्ड प्लॅट कंपनी बनावटीचे सुटे पार्टस् खरेदीसाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक मे.अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद यांच्याकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५७% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे उल्कानगरी (गारखेडा) येथील जनकपुरी रेखांकनामधील न.भु.क्र.१५७६७/१३०, १३१ व १३२ या मिळकती (१३१ व १३२ च्या मधुन गेलेला) समोरील ९.०० मी. रूंद रस्ता पुढे समाप्त (Dead End) होत असून या स्टेजला रस्ता बंद होत असल्याने पुढे या रस्त्याचा काहीही वापर होत नाही. त्याकरीता न.भु.क्र.१५७६७/ १३२ च्या दक्षिण बाजुच्या हद्यीएवढा रस्ता ज्याचे अंदाजित क्षेत्र १५० चौ.मी. असून सदर रस्त्याची जागा भुखंडाच्या मर्यादेपुरते एकत्रित करून देण्याची मागणी मिळकतधारक सौ.पुष्पा पृथ्वीराज बथरा व इतर यांनी केलेली आहे. तसेच सदरील क्षेत्राचे सिध्द शिघ्र गणकानुसार होणारे मुल्य मनपाकडे जमा करण्यास मिळकतधारक तयार आहेत.

सदरील रस्ता बंद होत असल्यामुळे व या रस्त्याचा कोणत्याही कारणास्तव सार्वजनिक वापर करता येणे शक्य नसल्याने संबंधीतांचे मागणीनुसार त्यांचे भुखंडाच्या मर्यादेपुरते एकत्रित करून दिल्यास महापालिकेचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. अर्जदाराचे सदरील मिळकतीमधील इमारतीचे नियोजन व्यवस्थित होण्यास मदत होईल. करीता त्यांचे भुखंडाच्या मर्यादेपुरते एकत्रित करून देण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे ,सदस्य,स्थायी समिती अनुमोदक : रविकांत गवळी, सदस्य,स्थायी समिती

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे उल्कानगरी (गारखेडा) येथील जनकपुरी रेखांकनामधील न.भु.क्र.१५७६७/१३०, १३१ व १३२ या मिळकती (१३१ व १३२ च्या मधुन गेलेला) समोरील ९.०० मी. रूंद रस्ता पुढे समाप्त (Dead End) होत असून या स्टेजला रस्ता बंद होत असल्याने, पुढे या रस्त्याचा काहीही वापर होत नाही. म्हणुन मिळकतधारक सौ.पुष्पा पृथ्वीराज बथरा व इतर यांनी त्यांचे भुखंडाच्या मर्यादेपुरते रस्त्याचे क्षेत्र एकत्रित करून देण्याची मागणी केल्यानुसार, सदरील क्षेत्राचे सिध्द शिघ्र गणकानुसार होणारे मुल्य मनपाकडे जमा करून घेऊन, न.भु.क्र.१५७६७/ १३२ च्या दक्षिण बाजुच्या हद्यीएवढी (अंदाजित क्षेत्र १५०

चौ.मी.) रस्त्याची जागा भुखंडाच्या मर्यादेपुरते एकत्रित करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

| | |
|---|---|
| श्री.अ.रशिद खान | : नवीन अधिकारी आलेले आहे परीचय करून घ्यावा. |
| मुख्य लेखा परीक्षक | : नाव विलास सोपानराव जाधव महापालिकेत मुख्य लेखा परीक्षक म्हणून दिनांक ५-६-२००८ रोजी रूजू झालो. मी २१ वर्ष वित्त विभागात शासनाच्या सहा विभागात काम केले आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : सेवा करण्याची आपल्याला संधी मिळाली आपले स्वागत करतो. काय सुधारणा करता येतील त्या आपण कराव्यात. |
| श्री.अ.रशीद खान | : रस्त्याचे दिशादर्शक फलक कोणता विभाग लावतो. राबीया दुर्रानी मकबरा असून त्यावर बीबी ऐवजी बीवी का मकबरा असे लिखाण केले. टाऊन हॉल चौकात एक बोर्डवरही वरील प्रमाणे लिखाण आहे. एमसीएनवर दाखवले महापालिकेची यात बदनामी होते. नाव बरोबर आहे की नाही शहानिशा करायला पाहिजे. न बघता बील अदा केले जाते हे योग्य नाही. |
| अति.शहर अभियंता | : सदर बोर्ड महापालिकेच्या वतीने बसविला नाही. कमानी केल्या त्यावरच रस्त्याची नावे दिली बैठक संपल्यानंतर याची चौकशी करण्यात येईल. |
| श्री.अ.रशीद खान | :महापालिकेने लावले नसेल खाजगी कुणी लावले असेल तर पोलीसात द्यावे. इतिहास बदलीत आहे हे योग्य नाही. |
| मा.सभापती | : बैठक संपल्यानंतर याची शहानिशा करावी माझेकडे माहिती सादर करावी. |
| श्री.अ.रशीद खान | : उर्दु माध्यमाचे विदयार्थ्यांना ४ तारखेला पुस्तके देणार होते. पालक सेन्टरवर येवून जात आहे. का उशीर केला? |
| उपआयुक्त(प्र.) | : केंद शासन व राज्य शासन निर्देशानुसार महापालिका हद्यीत ज्या शाळा सेमी अनुदानीत आहे.अशा महापालिकेच्या ७६ शाळा व खाजगी २८३ शाळाचे नियोजन करून प्रत्येक शाळेचे ग्रुप केले पुस्तकाचे वाटप १६ तारखेला त्या त्या शाळेमध्ये होणार आहे. या बाबत प्रसिध्दी दिली आहे. शाळा सुरू झाल्यावर शाळेतून मिळेल. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : शासनाने ट्राफिक सिग्नल व इतर कामासाठी महापालिकेला १०-११ कोटी दिले. जालना रोड वगळता कुठे सिग्नल चालू असल्याचे दिसून येत नाही १० कोटी कुठे खर्च झाले ते सिग्नल चालू स्थितीत आहे का? |
| कार्य.अभियंता(विद्यु.) | : १.०० कोटी खर्च झाला बिलो टेंडर होते. तीन वर्ष त्या संस्थेनेच बघावे असे होते २६ चौकात आधुनिक प्रकारचे सिग्नल लावलेले आहे.जालना रोडवरील सर्व चालू आहे काही सिग्नलसाठी स्वतंत्र मिटर घेण्याची कार्यवाही चालू असून ती झाल्यानंतर सर्वच चालू होतील. ट्राफिक विभागाला पत्र दिले. आणखी सुधारणा असेल तर ते मागविले आहे. त्यानुसार बदल करता येईल. किती चालू झाले याची माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल. |
| श्री.अ.रशिद खान | : चार पाच ठिकाणचे ट्राफिक सिग्नल ड्रम प्रोजेक्ट एजन्सीने तोडले काय ॲक्शन घेतली. खड्डे करतात, दुरूस्त करीत नाही. |
| कार्य.अभियंता(विद्यु) | : एक दोन ठिकाणी ड्रम प्रोजेक्ट एजन्सीचे केबल डॅमीज केले. एमएसईबीला तसे पत्र दिले. |
| श्री.अ.रशीद खान | : जोपर्यंत पैसे भरणा करीत नाही तोपर्यत काम थांबवावे. रस्त्यावर अनेक ठिकाणी खोदकाम केले होते ७८ लक्ष भरणा करणेसाठी अतिरिक्त शहर अभियंता यांनी नोटीस दिली. मोठमोठे खड्डे पडत आहे डांबरही टाकत नाही. अपघात होण्याची शक्यता आहे याकडे लक्ष द्यावे. |

| | |
|---|---|
| मा.सभापती | : या संबधी सभागृहाला लिखित स्वरूपात माहिती द्यावी. |
| श्री.सिताराम सुरे | : २६ सिग्नल कुणाच्या आदेशाने कार्यरत केले. |
| कार्य.अभियंत(विद्यु) | : मा.पोलीस आयुक्त यांनीही परवानगी दिली आहे. |
| श्री.सिताराम सुरे | : या प्रमाणेच जळगाव रस्त्यावर आंबेडकर चौक, वखार्ड गरवारे, शरद हॉटेल व हर्सुल टि पॉईट चौकात ही वाहतूक सिग्नल बसवावे. |
| मा.सभापती | : स.सदस्य श्री.सिताराम सुरे यांनी केलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करावी. |
| सौ.मोमीन सफिया फिरदोस | : ३० मे २००८ रोजी रात्री ८-०० वा. १९ वर्षाचा श्री.मो.आसिफ मीर रज्जाक यांचा महापालिकेच्या हद्यीत असलेल्या विद्युत पोल मध्ये वीज प्रवाह असल्याने रात्री मृत्यू झाला. कर्मचारी श्री.देशमुख यांना अनेक वेळा पत्र देवूनही त्यांचे निष्काळजीपणामुळे ही घटना घडली. त्यांना निलंबीत करावे व संबधीत व्यक्तीचे कुटूंब मोठे आहे त्यांचे कुटूंबीयांना पाच लक्षची आर्थीक मदत करावी. |
| श्री.सतीश कटकटे | :आर्थीक मदत किती व करता येते का? ठेकेदाराकडूनही मदत घ्यावी. |
| कार्य.अभियंता(विद्यु) | :घटना घडली त्या ठिकाणी जावून पोलची तपासणी केली तेव्हा त्यात करन्ट नव्हते. घटना घडली त्यावेळी व पंचनामा केला पंजाब हॉटेलच्या उजव्या बाजुला ४थ्या क्रमांकाचा पोल. त्यावेळी ही या विभागाकडे कुणीही कल्पना दिली नाही. पोलीसांनी पंचनामा केला त्यावेळेसही आम्हाला बोलावले नाही. तरी तपासले, लिकेज नव्हते. राज्य शासनास पत्र दिले. याची तांत्रिक चौकशी करणार व तसा अहवाल देणार आहे त्यानुसार पुढील कार्यवाही करता येईल. |
| श्री.अ.रशीद खान | : सर्वसाधारण सभेला अधिकार आहे. |
| मा.सभापती | : प्रायव्हेट एजन्सीला मेन्टेनन्स साठी दिले होते अशी घटना विज प्रवाहामूळे होवू नये त्या एजन्सीचीही जबाबदारी होती. एजन्सी फिक्सींग स्थायी समितीने केली. ठेकेदाराकडून मदत मिळण्यासाठी कार्यवाही करावी महापालिकेच्या वतीने द्यायचे झाल्यास सर्वसाधारण सभेकडे ठेवावे. |
| श्री.सतीश कटकटे | :ठेका दिला अटी शर्ती काय होत्या अशी घटना घडल्यानंतर मदत एजन्सी देवू शकते का ते ही बघावे. |
| मा.सभापती | : किती आर्थीक मदत देवू शकतो अट क्र. ११ मध्ये दिले आहे. |
| कार्य.अभियंता(विद्यु.) | : अपघात वगैरे झाला तर जबाबदारी एजन्सीची राहील असे दिले आहे. ही घटना घडलेली आहे मुद्यामहून झालेले नाही. त्या व्यक्तीच्या कुटूंबीयांना मदत पण मिळायला पाहिजे. आतापर्यंत मदत देण्याचे काम सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने केले आहे. स्थायी समितीने आदेशीत केले तर सर्वसाधारण सभेकडे तसा सविस्तर प्रस्ताव ठेवला जाईल. |
| मा.सभापती | : कुत्र्याचा मृत्यू झाला काही संबध नव्हता तरी एक लक्ष मदत दिली. लाईटची एजन्सी ही स्थायी समितीने फिक्स केली आहे. अट क्र. ११ मध्ये दिले की जर अशी घटना घडल्यानंतर संबधीत एजन्सी जबाबदार राहील. |
| कार्य.अभियंता(विद्यु.) | : विद्युत निरीक्षक यांना पत्र दिले आहे त्यांचा अहवाल आल्यानंतरच जबाबदारी फिक्स करू शकतो. याच विभागाशी संबधीत आहे. शहरात रस्त्याची मोठया प्रमाणात कामे चालू असून उंची वाढली त्यामूळे पथदिव्याचे जंक्शन बॉक्स खाली आले, अपघात होवू शकतात. ते वरती घेण्यासाठी व फायबरचे बॉक्स लावण्यासाठी या सभागृहाने आदेशीत केले तर काम करता येईल. |
| मा.सभापती | : त्या कामाचे ताबडतोब अंदाजपत्रक तयार करावे. श्री.आसिफ मीर रज्जाक यांचे कुटूंबीयांना नियमानूसार काय मदत करता येईल पूढील स्थायी समितीमध्ये तसा प्रस्ताव ठेवावा. |

श्री.कचरू मोरे : चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या बाजूला रस्ता बंद केला होता तो चालू करून तेथे पेट्रोलपंप चालकाच्या सोयीसाठी ट्राफिक सिग्नल बसविले जनतेच्या सोयीसाठी बसविले नाही असा माझा आरोप आहे. ते काढून एसएससी बोर्ड चौकात मोठी ट्राफिक असून तेथे बसविणे गरजचे आहे.

कार्य.अभियंता(विद्यु.): कुठेही सिग्नल लावायचे झाल्यास ट्राफिक ब्रँच तसे पत्र येते पोलीस विभागाकडून तेथे ट्राफिक सिग्नल लावण्याचे पत्र आले त्यानुसार सिग्नल लावण्यात आले.

श्री.सतीश कटकटे : पूर्वी बंद होते चालू का केले.

श्री.कचरू मोरे : एसएससी बोर्ड चौकात लावण्यात यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : सदर सिग्नल बंद करण्यात यावे.

मा.सभापती : चुन्नीलाल पेट्रोल पंपच्या बाजूला असलेले दुभाजक बंद करून तेथे रस्ता असू नये व तेथील ट्राफिक सिग्नल तात्काळ काढून एसएससी बोर्ड चौकात बसविण्यात यावे व कार्यवाही केल्या बाबत दोन दिवसात अहवाल सादर करावा.

श्री.वसंत नरवडे पा. : स्पकेच्या माध्यमातून आलेल्या कराच्या नोटीसा जास्त रक्कमेच्या चुकीच्या आल्याने नागरीक त्रस्त आहेत. मंदीर, मस्जीद ही सोडले नाही. ९-१० हजार प्रकरणे आहेत. सकाळपासून १० लोक आले ज्यांनी सन २००७-२००८ पर्यंत कर भरणा केला त्यांना पुन्हा नोटीस आली. वार्ड अधिकाऱ्यांना अधिकार देवून त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून नियमानूसार जो टॅक्स येतो तोच लावावा. स्पेकच्या नोटीस रद्द कराव्या. मागच्या करमुल्याकंना प्रमाणे वसुली करावी असे नागरीकांचे मत आहे.

करमुल्य निर्धा.व संकलक : सन २००४-०५ मध्ये स्पेकने १.६४ लक्ष मालमत्तेचा सर्वे केला मा.आयुक्तांनी एप्रिल मध्ये बैठक घेतली स्पेकने दिलेल्या नोटीसेस वाटप कराव्या असे आदेशीत केले. नोटीसच्या नंतर जुन्या मालमत्तेत काही बदल नसेल तर स्पेकची नोटीस रद्य करून जो जुना रेकॉर्ड आहे. लिंकींग झालेली नाही. ज्यात बदल असेल ते रद्द करून जुन्या प्रमाणे तपासून सुनावणी देवून नोटीसा रद्द करता येईल.

श्री.वसंत नरवडे : माझे वार्डात एका मंदिरास १००० ऐवजी १० हजार टॅक्सची नोटीस दिली. स्पेकच्या नोटीसेस वाटप करू नये. नोटीस घेवून प्रत्यक्ष घराची पाहणी करावी नियमाने जो कर येतो तो आकारणी करावा. स्पेकने चुकीच्या नोटीसेस दिल्या त्यांना बिल देवू नये अनेक वेळा बजावले तरीही बिल देण्यात आले हे योग्य नाही.

उपआयुक्त (सिडको) : स्पेकने सन २००४ पासून सर्वेचे काम सुरू केले होते ३१ डिसेंबर २००७ अखेर १.६४ लक्ष मालमत्तेचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. स्पेकला आतापर्यत १-१८ कोटी पेमेन्ट दिले. दिलेल्या पेमेन्टमधून ५४ लक्ष दंड प्रतिदिन ५००० प्रमाणे ३१ डिसेंबर २००६अखेरपर्यंचा वसूल करण्यात आला अंतिम कामाचे मुल्यमापन करून साधारण ७५ लक्ष पेमेन्ट अंतीम होण्याची शक्यता आहे.

श्री.वसंत नरवडे : चुकीची मागणी दिलेली असेल. चुकीचे असेल, महानगरपालिकेतर्फे पाहणी करावी. बिलातून वगळावे.

श्री.रविकांत गवळी : सन २००५ पासून स्पेक एजन्सीच्या संदर्भात चर्चा होते. ज्या त्रुटी आहे त्याची कल्पना प्रशासनाला आहे. पुन्हा पुन्हा त्याच विषयावर चर्चा होते निर्णय होत नाही. ज्यांना टॅक्स आकारणी केली त्यांना नोटीस पावती केंव्हा दिली. प्रत्येक वर्षीच्या नोटीसेस त्या त्या वर्षीच देणे आवश्यक असतांना ४-४ वर्षापुर्वीच्या नोटीसा दिल्या हे नियमाने बरोबर आहे का सहा महिण्याची वेळ सर्वेसाठी दिली होती त्यानंतर तीन वर्ष मुदत वाढ कशाच्या अधारे दिली याचा ही खुलासा करावा.

उपआयुक्त (सिडको) : १ एप्रिल २००५ पासून स्पेकने केलेल्या सर्वेनुसार नोटीसेस दिल्या ज्यांनी ३१ मार्च २००८ अखेर कराचा भरणा केला असेल ती रक्कम अंतिम ठरविण्यात येईल ज्या इमारतीमध्ये कुठलाही बदल झाला नाही.

श्री.सतीश कटकटे : ज्यांनी परवानगी न घेता अनधिकृत पणे बांधकाम केले भोगवटा प्रमाणपत्र घेतले नाही अशा इमारतीचा शोध घेवून दंडासह टॅक्स वसूल करण्याकडे लक्ष द्यावे.

श्री.रविकांत गवळी : स्पेकला नवीन घराचा सर्वे करण्याचे काम सहा महिण्यासाठी दिले होते त्यानंतर नोटीसा देवून डायरेक्ट कर आकारणी करून वसूली करणार होतो सर्वेला चार वर्ष गेले. मनपाचे मोठे नुकसान झाले. मागिल चार वर्षाचे बिलाची नोटीस आता देणे नियमाने बरोबर आहे का ?

उपआयुक्त (सिडको) :ज्या नागरीकांनी २००८ अखेर पर्यत टॅक्स भरणा केला आताची दिलेली बिले त्यातून ती रक्कम वजा करण्यात येईल. इमारतीत बदल झाला नसेल त्याची स्थळ पाहणी करून कार्यवाही केली जाईल.

श्री.वसंत नरवडे : मागिल थकबाकीसह पाच वर्षाची नोटीसेस प्राप्त झालेल्या आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : मी सर्वसाधारण सभेत बोललो होतो. स्पेकला नोटीस देण्याचा अधिकार नाही. झालेल्या सर्वेनुसार बरोबर आहे का हे वार्ड अधिकारी यांनी बघावे व महापालिकेच्या माध्यमातून नोटीस द्यावी.

श्री.अ.रशिद खान : स्पेकने केलेले काम चुकीचे की बरोबर प्रशासनाने खुलासा करावा. बरोबर असेल तर नोटीस बरोबर आहे नसेल तर बील घेवून फसवणूक केली गुन्हा दाखल करावा. ज्यांनी दिले त्यांचे केले, नाहीतर नाही.

उपआयुक्त (सिडको) : सर्वे बरोबर केला. रेट ऑफ टॅक्सेसन हे नवीन दराने आकारले गेले जुन्या इमारतीचे दर पुर्वीचेच ठेवायला पाहिजे होते ते न झाल्याने कराची आकारणी वाजवी पेक्षा जास्त झाली.

श्री.अ.रशिद खान : त्यांना बिल का दिले.

श्री.सिताराम सुरे : ९० टक्के सर्वे चुकीचा झाला असून जुने नवीन घरांना सरसकट टॅक्स आकारणी केली. विनंती की एक कमेटी करावी. पुन्हा नोटीस नुसार त्या त्या मालमत्तेचा सर्वे करून नियमाने जे कर येतो तो आकारणी करावी स. सदस्य ही टॅक्स भरण्यासाठी नागरीकांची मानसिकता तयार करतील.अनेक लोक टॅक्स भरणा करण्यासाठी वार्ड कार्यालयात येतात कर भरणा करून घेतला जात नाही नागरीक परत जात आहे असे होवू नये. याची दखल घ्यावी.

श्री.वसंत नरवडे : नवीन मालमत्ता शोधाव्यात यासाठी स्पेकला काम दिले होते. त्यांनी सरसकट जुन्या घरांनाही असेसमेन्ट वाढवून वाढीव टॅक्स दिला ते चुकीचे आहे पुर्वी कधी फेरबदल झाला असेल तर ते ही करण्याचे काम होते. बदल झालाच नसेल अशाही मालमत्तेचा सर्वे करून वाढवून टॅक्स दिले.१००० हजार ऐवजी १०००० हजार टॅक्स येत असेल तर कुणीही भरणार नाही यामूळे जी वसुली होणार होती तीही होणार नाही. लोकांचे समाधान होईल अशा प्रकारे महानगरपालिकेने ३ दिवसांत निर्णय घ्यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : एकाच घराचे चार-चार नंबर करून बिल उचलले असे वाटते. कमेटी नेमण्या अगोदर नवीन अधिकारी आलेले आहे त्यांना टाईम लिमीट द्यावे संपूर्ण सर्वेक्षण करावे जो सर्वे करण्याची गरज नव्हती अशा मालमत्तेचे जी रक्कम स्पेकने उचलली त्या संदर्भात कायदेशीर कार्यवाही करावी.जे कर भरण्यास तयार आहे जेवढी ही रक्कम भरण्यास तयार असतील ती भरणा करून घेण्यासाठी मोहिम राबवावी.

श्री.सिताराम सुरे : पडेगाव येथील स्वातंत्र्य सैनिक कॉलनीतील अनेक नागरीकांनी कर भरणा करण्यासाठी वार्ड कार्यालय-अ मध्ये आले होते कर भरणा करून घेतला नाही.

मा.सभापती : स्पेकने सर्वे करतांना चुकीचा केला यासी मी सहमत आहे. या संदर्भात मा.आयुक्त व उपआयुक्त तसेच स्थायी समितीचे सदस्य याचे सह एक विशेष बैठक आयोजित करून चर्चा करून निर्णय घेवू. जे जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही होईल. वसुली झ

ाली तर विकास कामे होतील याची कल्पना सर्वांना आहे. वसुली व्हावी याकडे लक्ष दिले जाईल.

श्री.रविकांत गवळी : या सर्व प्रकारामूळे महानगरपालिकेचे जे काही नुकसान झाले यास जे कुणी जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : पेव्हर ब्लॉक पाहणीसाठी कोण गेलेले होते. त्याचा रिपोर्ट काय आहे तो सादर करावा.

उपआयुक्त (म) : सदर ठिकाणी काम चालू आहे किंवा कसे? व मटेरियल हे कामाच्या ठिकाणी उतरलेले आहेत का? याची चौकशी करण्यासाठी दि.१३/५/२००८ च्या सभेत चर्चा झ ाली होती. माझी नियुक्ती केली होती. आझाद चौक येथे ६x१०x२x७ आकाराचे व चंपा चौक येथे ४०० मीटर अंतरावर संबंधीत ठेकेदाराच्या जागेत २८x१३x२.६५ मध्ये पेव्हर ब्लॉक ठेवलेले आढळून आले.

श्री.सिताराम सुरे : ८० लक्ष ॲडव्हान्स दिले ज्यांनी सहा महिण्यापूर्वीच कामे केले त्यांना बिल नाही. ६.५ कोटीची बीले थकलेली आहेत. या रक्कमेत मागिल काही ठेकेदाराची बिले अदा करता आली असती.आज ही शहरात रस्त्याची कामे चालू केली नाही.

अति.शहर अभियंता : शहरातील मुख्य चौकाचे पुणे, मुंबई धर्तीवर विकास करण्याची कामे केंद्र शासनाच्या १२ व्या वित्त आयोगाच्या निधीतून होत आहे. जेवढे पेव्हर ब्लॉक पाहिजे ते महापालिकेला प्राप्त झाले होते. याची टेस्टींग व खात्री केली. पीडब्ल्यूडी अकाऊंट मॅन्युअल प्रमाणे मटेरियलच्या ७५ टक्के पेमेन्ट देता येते. असे असतांना सुध्दा ७५ टक्के पेमेन्ट न करता ५१ टक्केच पेमेन्ट जवळपास ४० लक्ष अदा केले.

श्री.सिताराम सुरे : मागच्या वेळी ८० लाख दिले म्हणुन खुलासा झाला होता. काम न करता ॲडव्हान्स मध्ये ४० लक्ष देण्याची गरज होती का, त्याचेकडे बजेट नव्हते तर काम घ्यायला नको होते. वित्त आयोगाच्या निधीतून पेव्हर ब्लॉकचेच काम करू शकतो का?

अति.शहर अभियंता : इतरही कामासाठी खर्च करता येतात. परंतू या निधीतून पेव्हर ब्लॉक बसविण्याचा निर्णय सर्वेसाधारण सभेनेच घेतलेला आहे.

श्री.सिताराम सुरे : मागिल कामाचे बील थकल्यामूळे गुत्तेदार काम चालू करीत नाही.

श्री.रविकांत गवळी : माझे माहिती प्रमाणे १२व्या वित्त आयोगाकडून या कामासाठी तरतूद होवून आलेली ही रक्कम आहे.

मा.सभापती : हा सर्वसाधारण सभेचा निर्णय आहे हाही निर्णय सर्वसाधारण सभेनेच घेतलेला आहे.सर्वसाधारण सभेत विरोध केला असता तर इतर कामासाठी हा निधी वापरता आले असते.

श्री.सिताराम सुरे : ॲडव्हॉन्स द्यायची गरज नव्हती. २-४ कामे सुरू करता आले असते. जे गुत्तेदार काम करीत नाही त्यांना काळया यादीत टाकावे.

श्री.सतीश कटकटे : साठा उपलब्ध असल्याचा रिपोर्ट आहे का? सॅम्पल पाठवितो त्यांचा रिपोर्ट येण्या अगोदर मटेरियल आले की नंतर आले याचा ही खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : मटेरियल आल्यानंतर सॅम्पल तपासणीसाठी पाठविले जाते. मटेरियल ठरल्याप्रमाणे बरोबर नसेल तर ती ठेकेदाराची जबाबदारी असते.

श्री.सतीश कटकटे : या शहरात पाच ठिकाणी लॅब असतांना धुळे येथे का पाठविले.

अति.शहर अभियंता :तेथे इंजिनिअरींग व पॉल्टेक्नीक कॉलेज मध्ये जी टेस्ट घ्यायची आहे त्याची व्यवस्था नाही, ४ टेस्ट घ्यायचे आहे. ज्या प्रयोगशाळेत व्यवस्था आहे तेथेच पाठवायचे म्हणून धुळे येथे पाठविले.

श्री.सतीश कटकटे : माल रिजेक्ट झाला तर त्यास जबाबदार कोण? या संदर्भात मी पत्र दिले ते वाचून दाखवावे.

अति.शहर अभियंता : ठेकेदाराकडून सर्व लेखी स्वरूपात करून घेतलेले असते. जबाबदारी असते.

| | |
|---|---|
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : एक एक विषय घ्यावा. या संदर्भात मा.सभापती यांनी प्रशासनाला पत्र दिले होते. त्यांचा खुलासा घ्यावा. |
| उपआयुक्त(म) | : सदर पत्र मा.आयुक्त यांचेकडे पाठविलेले आहे. |
| श्री.सतीश कटकटे | : आयुक्तांचा चार्ज उपआयुक्तांकडेच होता आयुक्तांकडे पत्र पाठविण्याची गरज नव्हती. उत्तर का दिले नाही.सभापतीच्या पत्राला महत्व देत नसेल योग्य नाही. |
| मा.सभापती | : १६-५-२००८ रोजी या संदर्भात चौकशी करावी म्हणून पत्र दिले होते.त्यावेळी उपआयुक्त हे आयुक्त म्हणूनच होते. २५ दिवस गेले उत्तर मिळालेले नाही. |
| उपआयुक्त (म) | : मा.आयुक्त निवडणूकीच्या कामासाठी गेलेले आहे त्यांचा चार्ज माझेकडे नव्हता.त्यांचे कार्यालयात ते पत्र पाठविणे गरजेचे होते. पूढील बैठकीच्या अगोदर पत्राचे उत्तर दिले जाईल. |
| मा.सभापती | : प्रशासन स्थायी समितीच्या आदेशाला रिस्पॅान्स देत नाही. पत्र दिल्यानंतर उत्त्तर दिले जात नाही प्रशासन मनमानी करीत आहे. पत्र देवून २५ दिवस झाले आजही पुढील बैठकीच्या अगोदर उत्त्तर दिले जाईल असे सांगितले जाते हे योग्य नाही. |
| उपआयुक्त(म) | : तांत्रिक चौकशीसाठी मा.आयुक्तांनी आदेश काढणे आवश्यक आहे. अतांत्रिक अहवाल दिला होता. या संदर्भात आजच मा. आयुक्तांशी चर्चा करून या बाबतीत निश्चित योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : पत्र दिल्यानंतर माहिती देण्यास उशीर लागत असेल तर तसे कळविले पाहिजे.ठेकेदाराच्या जागेवर मटेरियल टाकले म्हणजे महापालिकेचे ग्राहय धरता येते का? यानंतर पुर्ण काम झाल्याशिवाय पेमेन्ट करू नये. |
| श्री.अ.रशीद खान | : जोपर्यंत काम होत नाही, तोपर्यंत देवू नये. |
| अति.शहर अभियंता | : १०० टक्के मटेरियल आले ७५ टक्के पेमेन्ट देता येते. तरी सुध्दा ५१ टक्केच दिले यात खबरदारी म्हणून १५ टक्के रक्कम वजा करून दिले. |
| श्री.सतीश कटकटे | : २०-२२ टक्के बिलाने काम दिले याचे कारण काय? पेव्हर ब्लॉक कसे असावे पाण्यामध्ये किती वेळ असावे याचा जीआर असेल त्यानूसार खरेदी केले का? |
| अति.शहर अभियंता | : इटालीयन १०० एमएम जाडीचे पेव्हर ब्लॉक आहेत. फुटपॉथवर जे वापरले जाते त्यांची जाडी ६० एमएमची व ग्रेड कमी याचा आयएस कोड असतो |
| श्री.सतीश कटकटे | : मटेरियल कोठून घेतले जकात भरणा केलेली पावती असेल. ती दाखवावी. |
| अति.शहर अभियंता | : हे मटेरियल बाहेरील असून जकात पावती बध्दल सांगता येणार नाही माझे संबधीत येत नाही. |
| श्री.सिताराम सुरे | : कोणत्या कंपनी मार्फत आलेले आहे. |
| अति.शहर अभिंयता | : जालन्याची कंपनी आहे. इटालियन हे त्याचे स्पेसीफिकेशन प्रमाणे नाव दिलेले आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : सर्वच पेव्हर ब्लॉक इटालियनच असते पेट्रोल पंपच्या ठिकाणी बसवतो त्याची जाडी ग्रेड कमी असेल.हा लोकलचे मटेरियल दिसते. काम चागले झाले नाही तर जनता महापालिकेलाच बदनाम करील. काम करायचे तर चांगलेच केले पाहिजे एक वर्षाचे टाईम लिमिट का दिले. |
| अति.शहर अभियंता | : एक वर्षाची मुदत दिलेली आहे. काम एक महिण्यात संपविणार आहे. मेजर ॲटम म्हणजे मटेरियल आणणे आहे फिक्सींगला जास्त वेळ लागत नाही. |
| मा.सभापती | : ईटालियन पेव्हर ब्लॉक म्हणजे काय लोकल की बाहेरचे खुलासा करावा. |
| उपआयुक्त (म) | : मी जेंव्हा चौकशी केली तेव्हा गुत्तेदाराने हे लोकलचे मटेरियल असल्याचे सांगितले. |
| श्री.कचरू मोरे | : ४० लक्ष काम न करता अगोदर पेमेन्ट दिले जाते. यापूर्वी असे काम करणा-या ठेकेदारास दिले होते का महापालिकेची प्रशासन स्वत:फसवणूक करून घेते स्पष्ट दिसते. हे काम कुणी तरी करायला लावलेले आहे. झालेली चूक मान्य करावी. यापूढे होणार नाही याची दखल घ्यावी. |

| | |
|---|---|
| अति.शहर अभियंता | : ई-टेंडरवर भरलेले आहे. |
| श्री.सतीश कटकटे | : पेव्हर ब्लॉक चांगल्या दर्जाचे नाही. ५ टन वजनाची गाडी गेल्यास खराब होणार आहे. |
| अति.शहर अभियंता | : पंचवटी चौक येथे काम चालू आहे. बीड बायपास वरून या बाजुने ४० टन वजनाचे ट्रक जातात. शाश्वती होईल. |
| श्री.कचरू मोरे | : काम करणाऱ्या ठेकेदाराची बिले थांबविली. ज्यांनी काम केले नाही त्यांना ॲडव्हॉन्स दिले जाते हे योग्य नाही. प्रशासनकडून चूक झालेली आहे क्षम्य करावी. |
| श्री.अ.रशिद खान | : या संदर्भात चौकशी नेमावी ३-४ दिवसात चौकशीचा अहवाल मागवावा. |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | : सखोल चौकशी करावी, यापुढे असे होऊ नये. |
| मा.सभापती | : या संदर्भात दि १३-५-२००८ रोजीच्या बैठकीत चर्चाप्रमाणे उप आयुक्त(म.) यांचेकडून चौकशीचा अहवाल मागविला. त्यांनी मा. सभापतीकडे अहवाल दाखल केला. स.सदस्य श्री.गवळी, श्री.कटकटे यांनी तांत्रिक मार्फत चौकशी करण्याची मागणी केली होती. कार्य.अभियंता श्री. डीपी कुलकर्णी तसेच उपअभियंता श्री. काझी मोईनोद्यीन यांचे कडून करून घेण्याबाबत १६-५-२००८ रोजी मा.आयुक्तांना पत्र दिले त्या पत्राची प्रशासनाने दखल घेतली नाही ही खेदाची बाब आहे. म्हणून या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी महापालिकेत नवीन रूजू झालेले मुख्य लेखा परीक्षक यांनी १०दिवसाच्या आत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून स्थायी समितीला अहवाल सादर करावा त्यानंतर त्यात जे कुणी दोाषी असेल त्यांचेवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : पावसाळया पूर्वी नाल्याची तसेच गटारची साफ सफाई व्हावी.याला प्राधान्य देण्यात यावे. |
| मा.सभापती | : वार्ड कार्यालय मार्फत कामे होत आहे.शहरात स्वच्छता राहील नाले साफ होतील याकडे लक्ष देण्याची गरज आहे. |

"राष्ट्रगीता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद